UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

## मूर्तिशिल्प, कला व स्थापत्य विशेषांक

वर्ष १२ वे, अंक – चौथा; जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२२

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●
डॉ. जगदीश व्यंकटराव भेलोंडे

● संपादक मंडळ ●
डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. फुला बागूल
डॉ. अनिल गर्जे
डॉ. ताहेर पठाण
डॉ. वंदना महाजन
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. ममता इंगोले
डॉ. वामन जाधव
डॉ. यशवंत सोनुने

मूल्य : २०० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३. मो. ९९०४००३९९८



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 30. | यादव कालीन नेवासा तालुक्यातील काळेगावच्या ताम्रपटाचा अभ्यास : एक दृष्टिक्षेप - डॉ. संभाजी दराडे | 141 - 145 |
| 31. | प्राचीन शिल्पकलेचा भारतीय वारसा<br>- डॉ. प्रभाकर गणपत गावंड | 146 - 150 |
| 32. | वीरगळ (वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर)<br>- सौ सुजाता सचिन देशमुख | 151 - 154 |
| 33. | बौद्ध धर्मिय स्थापत्य कला : स्तूप<br>- डॉ. बाळासाहेब भिमराव अंभोरे | 155 - 159 |
| 34. | यवतमाळ शहरातील हेमाडपंती स्थापत्य - शिवालय<br>- कु. भाग्यश्री श्रीकृष्णराव गाडगे | 160 - 164 |
| 35. | भारतीय स्थापत्य कला शैली प्रकारांचा एक अभ्यास<br>- डॉ. डी. डी. कोल्हेकर | 165 - 169 |
| 36. | भारतीय कलेत शक्ती उपासना<br>- डॉ.विवेकानंद लक्ष्मण चव्हाण | 170 - 175 |
| 37. | वास्तुसार प्रकरणातील चित्रित बिंबपरीक्षा<br>- महावीर सुरेश पाटील | 176 - 181 |
| 38. | सातवाहन कालीन कला व स्थापत्य<br>- डॉ. शिला सखाराम सहाने | 182 - 185 |
| 39. | महायान पंथाच्या प्रसारामुळे लेणी स्थापत्यकलेवर पडलेला प्रभाव<br>- कृष्णा अर्जुन गावित | 186 - 189 |
| 40. | पूर्व मध्यकालीन महाराष्ट्रातील स्थापत्याचा नागरी परिप्रेक्ष्यातून अभ्यास<br>- प्रा. डॉ. मरे राजकुमार श्रीहरी | 190 - 194 |
| 41. | मरळक येथील विमलेश्वर चे पुरातन मंदिर<br>- लेफ्ट. डॉ. पावडे खोब्राजी वामनराव | 195 - 197 |
| 42. | अंधकासुर वध दशावतार लेणे, वेरूळ<br>- सूर्यकांतफकिरा जाधव, प्रा.डॉ. शिरीष आंबेकर | 198 - 202 |
| 43. | भारतीय स्थापत्य समृद्धीची विविधता शोध आणि सीमा जागतीक भारतीय शिल्पकलेचा - नंदकिशोर सैंदाणे पितांबर | 203 - 208 |
| 44. | लातूर जिल्ह्यातील खरोसा बौध्दलेणी एक ऐतिहासिक अवलोकन<br>- प्रा.डॉ. बालाजी मारूती गव्हाळे | 209 - 212 |
| 45. | कंधार परिसरातील जैन सर्वतोभद्र मूर्ती | 213 - 215 |




Scanned by CamScanner



# मरळक येथील विमलेश्वर चे पुरातन मंदिर

**- लेफ्ट. डॉ. पावडे खोब्राजी वामनराव**

शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकरमहाविद्यालय कळंब,ता.कळंब,जी.उस्मानाबाद.

मो.न.9970798803,९७६७९३६९००,ई-मेल : haribhaupawde123@gmail.com

प्राचीन काळापासून भारतीयांचे जीवन हे दर्शनक, अध्यात्मिक, मूल्याने व्यापलेले आहे.हे मूल्य धर्मावर आधारित असल्याने धर्माची प्रत्यक्ष अभिव्यक्ती मूर्ती व मंदिरातून होत, असल्याचे दिसून येते. प्राचीन काळापासून मंदिर शब्दाला अनेक पर्यायी शब्द वापरण्यात आलेले आहेत जसे देवालय, देवकुंल, देवस्थान वगैरे या सर्व शब्दावरून ठळकपणे देवांचे आश्रय किंवा निवास स्थान म्हणजे मंदिर असे म्हणता येईल. प्राचीन काळापासून भारतात मूर्तिपूजा अस्तित्वात असल्याचे अनेक पुरावे आज उपलब्ध आहेत, यावरून असा अंदाज बांधता येतो की या मूर्तीच्या स्थापनेसाठी पुढे पुढे मंदिरांची निर्मिती झाली असावी आज घडीला देशाच्या विविध भागांमध्ये विविध देव-देवतांची मंदिरे आपणास पहावयास मिळतात गुप्त कालखंड पासून ते आधुनिक काळापर्यंत अनेक राजघराण्यांनी मंदिराच्या उभारणीला प्रोत्साहन दिल्याचे दिसून येते.दक्षिण भारतात नावारूपाला आलेले राजघराण्या पैकी एक असणारे यादव राजघराणे यांचाकालखंडामध्येजी मंदिरे उभारली गेली, ती हेमाडपंती मंदिरे म्हणून ओळखली जातात .या अशा शैलीचे असणारे, नांदेड जिल्ह्यातील मरळकया गावी विमलेश्वर महादेव मंदिरावर प्रस्तुत शोधनिबंधात प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला गेला आहे. यासाठी काही दुय्यम लिखित साधनांची,प्रत्यक्ष पाहणी व मुलाखती यांचा वापर केला गेला आहेत.

**विमलेश्वर महादेव मंदिर :-**

नांदेड जिल्ह्यातील नांदेड पासून पश्चिम दिशेला जवळपास 15 किलोमीटर अंतरावर मरळक हे गाव आहे .या गावात पुरातन असे विमलेश्वर महादेवाचे मंदिर आहे, या मंदिराचा उल्लेख पांडव प्रताप या ग्रंथाच्या 35 व्या अध्यायात व रामविजय या ग्रंथाच्या पाचव्या अध्यायात आलेला दिसून येतो . या मंदिराच्या रचनेवरून हे एक हेमाडपंती मंदिर म्हणून ओळखले जाते. या मंदिराची विभागणी गर्भगृह, अंतराळ, सभामंडप साधारणपणे अशाप्रकारे करता येते, मंदिराच्या गर्भगृहामध्ये मध्यभागी शिवपिंडीची स्थापना केलेली आहे .शिवपिंड ही दगडाची आहे.या मंदिराचे गर्भगृह हे



Scanned by CamScanner

4/4 फूट लांबीची आहे.चार खांबावर उभे असल्याचे दिसून येते, येथील गर्भ ग्रहात शिल्प अथवा नक्षीकाम असल्याचे दिसून येत नाही.[१]

मंदिराच्या गर्भग्रहनंतर अंतराळ आहे, हा अंतराळ तीन बाय चार फूट लांबीचा आहे गर्भगृहाच्या ग्रहात प्रवेश करण्यासाठी जोदरवाजा आहे त्याच्या ललाट बिंबावर गणपतीचे शिल्प आहे .गर्भगृहाचे प्रवेशद्वार साध्ये असून, ते एकाच द्वार शाखेचे आहे .हे प्रवेशद्वार चार फूट उंचीचे व अडीच ते तीन फूट लांबीचे आहे .अंतराळ आला देखील चार दगडी खांब असल्याचे दिसून येते. गर्भगृहाच्या खाबा प्रमाणेच अंतराळाच्या खांबा वरही नक्षी अथवा शिल्प कोरलेले दिसून येत नाहीत. अंतराळामध्ये दक्षिण दिशेस व उत्तर दिशेस देवळी आहेव ज्यांचा वापर प्रकाशासाठी अथवा दिवा लावण्यासाठी केल्या जात असावा अंतराळ अंतराळाच्या वरच्या बाजूस गोलाकार भवरा सदृश्य चिन्ह कोरल्या गेलेले आहे.[२] अंतराळ नंतर येतो तो म्हणजे सभामंडप हा सभामंडप एकूण दगडी 20 खांबावर उभारलेला आहे .त्याची लांबी दक्षिण-उत्तर तीस फूट व पूर्व-पश्चिम लांबी वीस फूट आहे. सभामंडपामध्ये अंतराळाच्या बाजूने एका दगडावर नंदीची बैठी मूर्ती आहे, हा नंदी अलंकृत आहे. त्याची उंची तीन फूट व रुंदी अडीच फूट आहे. या नंदीच्या समोरील दोन्ही पायांच्या मधोमध एक शिल्प आहे. त्याची ओळख पाठवता आली नाही, हे शिल्प हात जोडलेल्या अवस्थेत आहे. सभामंडपात प्रवेशासाठी पूर्व दिशेला कडून मुख्य प्रवेशद्वार आहे, तसेच बाहेर पडण्यासाठी उत्तर दिशेकडून देखील एक प्रवेशद्वार आहे. गर्भ ग्रह अंतराळ व सभामंडप यामध्ये सर्वत्र दगडी फरशीचे आच्छादन केल्याचे दिसून येते.[३]या मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार हे पूर्व भिमुख असल्यामुळे,हे मंदिर पूर्वभिमुख मानल्या जाते. या मंदिराची सर्व रचनाही दगडी शिळान पासून केल्या गेली आहे. हे करत असताना दगडी शिळाएकमेकांवर ठेवलेल्या दिसून येतात.त्यांना जोडण्यासाठी कशाचाही वापर केल्याचे दिसून येत नाही. मंदिरांच्या बाह्य बाजूने काही शिल्प कोरलेले आहेत, परंतु मंदिरावरील रंगरंगोटीमुळे हे या शिल्पांची ओळख पटवणे, त्यांचा कालखंड ठरवणे कठीण जाते. आजच्या घडीला मंदिरात वरील शिखर हे नव्याने बांधल्याचे दिसून येते. स्थानिकांच्या माहिती वरून या मंदिराचे शिखर हे दगडांनी उभारले असल्याचे बोलल्या जाते.

मंदिराच्या पूर्व दिशेला अर्थात मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या समोर एक अष्टकोणी बारव आहे.[४] या बारवेत उतरण्यासाठी उत्तर दिशेकडून पायऱ्यांची निर्मिती करण्यात आलेली आहे..बारवेत उतरल्यानंतर जो पहिला सोपान आहे तेथे उत्तर दिशेची बाजू सोडता सर्व बाजूस देवकोष्ट असल्याचे दिसून येते.या देवकोष्ट ची एकूण संख्या सात आहे. या सर्व देवकोष्टमध्ये सप्तमातृत मूर्ती असाव्यात असा अंदाज बांधला जातो. मात्र सद्य परिस्थितीत हे सातही देवकोष्ट रिकाम्या अवस्थेत असल्याचे दिसून येते. या बारव मध्ये उतरण्यासाठी एकूण 40 पायऱ्या आहेत. बारवे ची एकूण खोली 40 फूट आहे. वर पासून ते बारवेच्या तळापर्यंत बारव ही निमुळती होत, जाऊन तिचे रूपांतर तळाशी एका कुंडात झालेले आहे.[५]या बारावीची निर्मितीही दगडी शिळानी केल्याचे दिसून येते.बारवेच्या उत्तर बाजूस 9.4 बाय एक 1.17 बाय 0.54 मी .आकाराचा दगडी हौद बांधलेला आहे, या हौदच्या चौथार्या ची रुंदी 1.54 मी. आहे. हा हौद बारवे पासून 7.50 मीटर अंतरावर आहे. पाणी उपसून तेथे असलेल्या दगडी नालीच्या प्रणालीद्वारे हौदात जाईल. अशी परिपूर्ण व्यवस्था तेराव्या शतकामध्ये करण्यात आली.[६] असे वर्णन या बारवेच्या संदर्भाने केले गेले असले, तरी वर्तमान स्थिती मध्ये बारवेच्या बाजूला असणारा हा हौद व दगडी नाली लुप्त झालेली आहे. या ठिकाणी नवीन बांधकाम करण्यात आल्याचे दिसून येते,यावरून असे म्हणता येईल की आज मंदिरामध्ये नवीन बांधकाम करताना अनेक पुरातत्वीय अवशेष लुप्त होत आहेत.

या मंदिराच्या उत्तर दिशेला दोन समाधी आहेत, यासमाधीच्या बांधकामावरून त्या मराठा कालीन असाव्यात असे दिसून येते. मंदिरसभोवताली व परिसरात मोठ्या प्रमाणात नवीन बांधकाम झाल्याने. तेथे असणारी दगडी

Scanned by CamScanner

दीपमाळ,हौद आदी गोष्टी लुप्त झाल्या आहेत. बारवे च्या बाजूला एक दगडी शिळा आहे त्यावर मृत्तिका अथवा सतीचे किंवा जैन हाताचे आवश्यक असणारे शिल्प असल्याचे दिसून येतात.”या मंदिराच्या परिसरात संस्कृत, देवनागरी भाषा किंवा लिपी असलेला; यादव राजवंशातील राजा सिंघनदेव, यांचा तेराव्या शतकातील एक शिलालेख असल्याची नोंद व त्यावर रेस्वरदेव आणि सिंघनदेव ही दोन नावे स्पष्ट दिसतात. बाकी संदर्भ लागत नाहीत व व्यक्तिनामे नामे सिंघनदेव अशी नोंद असलेला शिलालेख असल्याची नोंद सापडते.‘परंतु सद्य परिस्थितीत हा शिलालेख मंदिर परिसरात दिसून किंवा मंदिरात दिसून येत नाही. या मंदिर परिसरामध्ये अनेक दगडी शिळा विखुरलेल्या अवस्थेत विखुरलेल्या भग्नावस्थेत पडलेल्या दिसून येतात.

सारांश रूपाने आपणास असे म्हणता येईल, की तेराव्या शतकात निर्माण झालेले मरळक येथील विमलेश्वर महादेव मंदिर हे इतिहास सांगणारे जिवंत प्रतीक आहे. परंतु कालौघात इतिहासाची साक्ष देणारी ह्या वस्तूकडे दुर्लक्ष मोठ्या प्रमाणामध्ये झाले किंवा ऐतिहासिक दृष्टिकोन तून या वास्तूच्या जतनासाठी प्रयत्न केल्या गेले नाही. त्यामुळे मंदिर व मंदिर परिसरातील इतिहास सांगणाऱ्या अनेक गोष्टी आज नामशेष किंवा लुप्त झालेल्या दिसून येत आहेत. आळंद जिल्हा औरंगाबाद येथील तसेच भैरव वाडी तालुका पाटोदा जिल्हा बीड येथील बारव लगत असणारा हौद याची साक्ष देणारे, हे मरळक येथील पुरातन मंदिराचे संवर्धन व संरक्षण होणे गरजेचे आहे.मंदिर परिसरातील नवनवीन बांधकामामुळेआज घडीला मंदिराचे पुरातत्त्व पुरातत्वीय महत्त्व नष्ट होण्याच्या मार्गावर येऊन ठेपले आहे असे.मला तरी वाटते.

**संदर्भ सूची :-**


- प्रत्यक्ष स्थळ पाहणी.
- मंदिरपुजारी शिवलिंगस्वामी यांची मुलाखात .
- स्थनिक नागरिक गंगाधरकदम याची मुलाखत .
- अ.शं. पाठक –महाराष्टातील बारव स्थापत्य आणी पारंपारिक जल व्यवस्थापन, उपरांतप्रकाशन, पुणे.-२०१७ पेज क्र.४८.
- मंदिरपुजारी शिवलिंगस्वामी यांची मुलाखात.
- उपरुक्त अ.शं. पाठक –महाराष्टातील बारव स्थापत्य आणी पारंपारिक जल व्यवस्थापन, उपरांत प्रकाशन, पुणे-२०१७ पेज क्र.६० .
- प्रत्यक्ष स्थळ पाहणी.
- नांदेडजिल्हा गॉझेट भाग -२, महाराष्टा शासन, मुबई-२०११ पेज क्र.३३८.


◆◆◆◆



Scanned by CamScanner